चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

१७ जुलै, २०१९



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)


# दुचाकी चोरी करणारे दोन आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

## आरोपीतांकडुन एकुण ०४ दुचाकी हस्तगत

दिनांक १६/०७/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की, दोन इसम केवलराम चौक रामनगर वार्ड चंद्रपुर येथे एक मोटार सायकल घेवुन विक्री करण्याच्या उद्द्शाने फिरत आहे. अशा माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखा पथकाने सापळा रचुन मिळालेल्या माहितीप्रमाणे दोन इसमास दुचाकीसह ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्यांचे ताब्यात असलेली मोटारसायकल ही त्यांचे मालकीची नसुन ति त्यांनी चोरी केल्याची आहे. यावरून दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांची कसुन चौकशी केली असता त्यांनी यापुर्वी पोलीस स्टेशन रामनगर, दुर्गापुर, पडोली हदद्ीतुन एकुण ३ दुचाकी चोरी केल्याची कबुली दिल्याने आरोपीतांच्या घरून ३ आणि त्यांचे ताब्यात असलेली एक असे एकुण ४ दुचाकी ज्यामध्ये १) हिरो होंडा स्प्लेंडर क्र. एम. एच ३४ एसी २७४८ किं. २५,०००/—रू, २) हिरो होंडा डिलक्स किं. २०,०००/—रू, ३) हिरो होंडा पॅशन एम.ए. ३४ एक्स ०४२२ किं. ४०,०००/—रू, ४) टीव्हीएस ज्युपीटर किं. एम.एच.३४ एसी २७४८ किं. २५,०००/—रू असा एकुण १,१०,०००/—रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपी नामे १) रोशन गंगाधर अवताळे, वय २० वर्ष, २) तेजस सुनिल राउत वय १९ वर्ष दोन्ही रा. लहुजी नगर एमआयडीसी चंद्रपुर यांना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीतांकडुन एकुण ०४ गुन्हे उघडकीस आले असुन पुढिल तपास रामनगर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात स्थागुशा प्रभारी पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे, यांचे नेतृत्वात पोउपनि मानकर यांचे सह सफौ. पंडीत, पोहवा. केमेकर, करकाडे, पोना. संजय, पोशि. अमोल, रवि, गोपाल, अनुप, प्रितम, प्रशांत नागोसे यांनी पार पाडली.

———————————————————————————————